

।। श्री गंगा माता ।।

# प.प. श्रीमन्नारायणस्वामी चरित्रशोध



।। श्री कृष्णावेणी माता ।।

■ श्री. सुहास मधुकर जोशी, कोल्हापूर

**कृष्णापंचनदीयोगेभ्यर्च्य श्रीदत्तपादुके ।**
**भक्त नारायणस्वामी जीवन्मुक्तोधुनाभवत् ।।**

प. प. श्रीमन्नारायणस्वामी चरित्रस्तोत्रातील आरंभीच्या या श्लोकांत श्रीनारायणस्वामींची साधना, चरित्र व अधिकार प. श्रीटेंब्येस्वामींनी सांगितला आहे. कृष्णा-पंचगंगानदीच्या संगमावरील श्रीदत्तपादुकांची भक्तीने अभ्यर्चना करुन श्रीनारायणस्वामी अलिकडे जीवन्मुक्त झाले.

अर्थात श्रीनृसिंहवाडीच्या श्रीदत्तपादुकांच्या केवळ पूजनाने किंवा भक्तिपूर्ण दर्शनाने (स्वपदपर्यालोचनात्) जीवन्मुक्ति लाभतेच हा यातून स्वामींचा सिद्धांतही दिसतो, शिवाय श्रीनारायणस्वामींच्या समाधीला २१० तर श्रीटेंब्येस्वामींच्या जन्माला १५० वर्षे म्हणून हे पद आहे. यातून आजही या ठिकाणी हा अनुभव येतो, हे सांगण्याच्या विचाराबरोबर प. टेंब्येस्वामींना अत्यंत प्रिय असलेल्या भक्तिमार्गाचाही येथे पुरस्कार केल्याचे दिसते.

प.प. श्री टेंब्येस्वामींच्या दैवीप्रज्ञेतून श्रीदत्तेच्छेने प्रगटलेल्या या चरित्राबरोबरच, अन्य समकालीन संदर्भातून आपण या चरित्रातल विशेष संशोधित भागांवर प्रकाश टाकणार आहोत. जे सर्वश्रुत चरित्र आहे ते संक्षेपाने पाहू.

जन्मगांव वीसापूर - कारनाटक देशतः.

वीसापूर (तासगांव) हे नारायणस्वामींचे जन्मगांव. हे पूर्वी कर्नाटक इलाख्यात येत असे कारण पूर्वी सांगलीपर्यंतचा इलाखा विजापुरकरांच्या हद्दीत येत असे. यामुळे यांच्या जन्मस्थानाबद्दल (कारनाटकदेशतः.) असे प. श्रीटेंब्येस्वामींनी म्हटले आहे.

छत्रपतींचे श्रीराजोपाध्ये (पंडितराव) व त्यांच्या लवाजम्यात ब्रह्मे, भागवत, जोशी, कुलकर्णी इ. मंडळी आली. या निमित्ताने श्रीनारायणस्वामींचे पूर्वज वीसापुरी वास्तव्यास आले.

वीसापूर या गावची इनामी छ. शिवाजी महाराजांचे पुत्र छ. राजाराम महाराजांनी शाकल्यगोत्री श्रीमुद्गलभट पंडितरावांस दिल्याची (शिव राजनयाभिषेक शके ५१ ची म्हणजे १६४७ ची) सनद आहे. हे छत्रपती घराण्याचे परंपरागत उपाध्ये असल्याने यांना राजोपाध्ये अशीही पदवी होती. वेद शास्त्रातील उत्तुंग विद्वतेबरोबच न्यायदानाच्या प्रक्रियेतही यांचे विशेष अधिकार असल्याने यांना पंडितराय (पंडितराई) अशी उपाधी मिळाली, हेच या गावचे इनामदार होते.

या मुद्गलभटांचे कनिष्ठ चिरंजीव श्री पं. जनार्दनबावा मुद्गलभट पंडितराव हे (पंडितराव) पदाचा कारभार व उपपंडितराई करीत. श्रीब्रह्मेंद्रस्वामींच्या समाधीप्रसंगी धावडशीस जाताना छ. शाहूमहाराजांसोबत पंडितराव म्हणून हेच गेले होते. हे

Scanned with Cam

विसापूरच्या पंडितराव (राजोपाध्ये) घराण्यातील मूळपुरुष दिसतात. यांचे सातान्यातील ज्येष्ठबंधु श्री. रघुनाथराव तथा अच्युतराव पंडितराव यांची कन्या बकुबाई हिचा विवाह चाकणचे प्रसिद्ध विद्वान् सत्पुरुष व श्री संत तुकोबांचे शिष्य श्री कचेश्वर ब्रह्मे यांच्याशी झाला होता.

(पूर्वी प्रत्येकांच्या पदरी असे राजोपाध्ये असत, यात नृसिंहवाडीचे राजोपाध्ये हे क्षेत्रस्थपुजारी घराणेच आहे. हे कोल्लापूर छत्रपतींचे व श्रीनारायणस्वामींचे नृसिंहवाडीचे तीर्थोपाध्ये होत. यामुळे यांच्याकडे नारायणस्वामींच्या समाराधनेसाठी इनाम जमिनी व समाराधना उत्सव सुरु आहे.)

**वीसापुरातील देवस्थाने**

**नारायणाचे मंदिर :** त्या काळी गावामध्ये अनेक अग्निहोत्री ब्राह्मण होते. सध्या मूळ ब्राह्मणांची मोजकीच घरे शिल्लक आहेत. वीसापुरात स्वामींच्या राहत्या घरासमोर (अंगणात) रुक्मिणी -पांडुरंगाचे देऊळ आहे. हे विठ्ठल मंदिर असले तरी यांस 'नारायणाचे मंदिर' म्हणतात, कारण हे नारायणस्वामींनी स्वतः स्थापन केले आहे. या मंदिरात दत्तपादुका व महादेवाची पिंडी इ. अन्य देवता आहेत. (सध्या या देवळाजवळ स्वामींच्या पवित्र वास्तूच्या जागी मोठा खड्डा व झाडे-झुडपे आहेत.)

**श्रीशामराज महाराज :** वीसापुरातील गावच्या ओढ्याकाठी श्रीशामराज महाराज यांची समाधी आहे. हे पैठणच्या एकनाथमहाराजांचे सांप्रदायिक होते व नारायणस्वामींच्या समकालीन होते. नारायण विधि अत्रिनाथ। दत्त जनार्दन एकनाथ ॥ असा यंचा संप्रदायगजर आहे. याशिवाय गावात विष्णुमंदिर, भावाईदेवी, मारुती मंदिर व रामेश्वर मंदिर आहेत.

**श्रीनारायणस्वामी :** हे घराणे गार्ग्यगोत्री, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असुन अत्यंत कर्मठ व परंपरेने अग्निहोत्री होते. यांची कुलदेवता शाकंभरी (बादामी) व श्रीदत्तात्रेय (औदुंबर) हे होते. श्रीनारायणाच्या (विठ्ठलाच्या) मंदिरामोर जोश्यांची घरे होती, यात श्रीनारायणस्वामींचे जन्मघर होते. या घरात एक चौथरा असून, त्याला एक कमान होती. या ठिकाणी स्वामींचा स्मार्ताग्नि व अनुष्ठानाची जागा होती असे वयस्कर व प्रत्यक्षदर्शी स्वामींच्या आप्तांनी सांगितले. (सध्या या ठिकाणी घराचा मागमूस देखिल नसून केवळ मोठ्ठा खड्डा व झुडपे आहेत.)

या घराण्यात (शके १६७० च्या दरम्यान) नारायणस्वामी तथा नारायणाचा जन्म झाला, यांना (दत्तात्रेय, श्रीपाद, नरहरी) तीन ज्येष्ठबंधु होते, नारायणांनी वेद व शास्त्राचा सांगोपांग अभ्यास केला होता. अध्ययनानंतर वीसापुरातच ते वेदाध्यापन व अग्निहोत्राचरण करु लागले. यांची प्रथमपत्नी लवकर निवर्तली.

**श्रीनारायणांचा द्वितीय विवाह -** तत्कालीन पद्धतीनुसार त्यांचा दुसरा विवाह, तारळ्याच्या श्री रामभट जोतभट गुळवणी, दीक्षित यांच्या कन्येशी झाला. गुळवण्यांच्या वंशावळीनुसार हरिपंत या मूळपुरुषांचे श्री रामभट हे नववे वंशज असून, हे अग्निहोत्री असल्याने यांना दीक्षित अशी उपाधी होती. यांना जिऊभट नावाचा मुलगा असून, या जिऊभटांचा पुत्र म्हणजे (श्रीगुळवणी महाराजांचे पणजोबा) नागेशभटजी होय. हेच तारळ्यातून कौलवास स्थलांतरीत झाले. या नात्याने श्रीनागेशभटजींची आत्याच श्रीनारायणस्वामींच्या पत्नी होत्या, असे दिसते.

श्रीदत्तांच्या आज्ञेने दुर्गमानवाडास श्रीविठ्ठलाई देवीच्या दर्शनास जात असताना, श्रीनारायणस्वामी कौलवगावी श्रीनागेशभटजी यांच्या घरी आले होते, (या ठिकाणी श्रीनारायणस्वामी स्थापित श्रीदत्तपादुका आहेत.) श्रीनागेशभटजींना संतती नव्हती, श्रीनारायणस्वामींच्या आशीर्वादाने त्यांना चार पुत्र झाले. स्वामींच्या आशीर्वादाचे स्मरण म्हणून पहिल्या मुलाचे नाव नारायण व पुढील अनुक्रमे सीताराम, रामभट व विठ्ठल अशी ठेवली. नारायणस्वामींनी या वंशातील प्रत्येक पिढीतील पुरुषाने कोल्हापुरातील नारायणस्वामी मठामध्ये सेवा करावी, अस दंडक दिला होता. (श्रीनारायणस्वामी चरित्र प्रस्तावनेत श्रीगुळवणीमहाराजांनी हा उल्लेख केला आहे.) नारायणस्वामी तारळ्यातील मोठ्या गुळवणी वाड्यात राहावयास येत. येथे



Scanned with Cam

श्रीनारायणस्वामी स्नान करीत असलेली विहीर इ. स्थाने होती.

**श्रीस्वामींचा संसार-** यापुढे यांना एक मुलगा (विश्वंभरभट्ट) व दोनकन्या झाल्या, काही दिवसांनी त्यांच्या दुसऱ्या पत्नीचे निधन झाले. यानंतर स्वतः नारायणांनी आपल्या अपत्यांचे पालन करीत वानप्रस्थाश्रम आरंभला.

**वादपराजय -** एकदा ते पुण्यास पेशवेदरबारी शास्त्रचर्चेसाठी गेले असता, एका शास्त्र्याकडून त्यांचा वादात पराभव झाला, हा अपमान सहन न झाल्याने आपल्या कुटुंबाची योग्यव्यवस्था लावुन ते शास्त्रशिक्षणासाठी काशीस गेले, तेथे त्यांना विद्वान् सत्पुरुषाचा सद्गुरूरूपात लाभ झाला.

अत्यंत कष्टाने विद्यार्जन केल्यानंतर गुरूंनी नारायणांकडे, कोणाशीही आमरण शास्त्रवाद न करण्याची गुरुदक्षिणा मागितली, याचबरोबर कृष्णापंचगंगासंगमस्थित श्रीनृसिंहसरस्वती स्वामींकडुन संन्यासदीक्षा मिळेल, असा भविष्यसूचक आशीर्वाद दिला. यामुळे मूलतः आध्यात्मिक पिंड असलेल्या नारायणांच्या मनातील लौकिकता गळाली व तेथील मूलस्वरूप निरभ्र झाले.

यानंतर अनेक विद्यार्थ्यांना ज्ञानदान करीत ते वीसापुरास राहू लागले. यावेळी कोणी त्यांस शास्त्रासंबंधी प्रश्न केल्यास 'गुरुआज्ञेनुसार वादप्रतिबंध असल्याने' हे कवि वामन, समर्थ रामदास, श्रीसंत ज्ञानेश्वरांच्या वचनानुसार पृच्छकाचे शंकानिरसन करीत असत. याच काळामध्ये त्यांनी नित्यानित्य विचार व उपनिषदांचा अभ्यास - मननादि केले. त्यांचे नेहमी नृसिंहवाडीस येणे होत असे. यानंतर योग्यवेळी त्यांनी आपल्या दोनही मुलींच्या विवाहाचे नियोजन करुन, प्रथम कन्या सेनापती कापशीस व दुसरी कन्या रट्टेहाळीस दिली.

यानंतर ते कोल्हापुरातील कात्यायनी डोंगरात उपासनेसाठी राहिले. श्रीकात्यायनीदेवीच्या मूळगर्भागाराच्या बाहेरील खोलीत डाव्याहाताला (मंदिरात सध्या गुरवपुजारी जेथे देव ठेवतात,) श्रीनारायणांचे उपासनास्थान होते व समोरील कात्यायनीतीर्थाच्या दक्षिणेस असलेल्या दगडीकट्ट्याच्या जागेवर त्यांचे निवासस्थान होते.

याचदरम्यान कोल्हापुरातील महालक्ष्मीमंदिरात उपासना करणाऱ्या सप्तशतीपाठक ब्राह्मणांस दर्शन देण्यासाठी आलेल्या जगदंबेने, नारायणांना कात्यायनीवरुन कोल्हापुरी बोलावले, यानंतर नारायण जगदंबेच्या आज्ञेनुसार कोल्हापुरीच राहू लागले.

कोल्हापूर - यावेळी महालक्ष्मीच्या दक्षिणेस, ओवऱ्यात नारायण राहू लागले. नित्य ध्यानधारणा व रात्री भजन असा नारायणांचा दिनक्रम होता, यांच्या रात्रीच्या भजनांस साक्षात् जगदंबा व श्रीदत्तगुरु उपस्थित राहात असत. काही काळानंतर त्यांना श्रीदत्तप्रभूंनी आज्ञा केल्यानंतर ते श्रीक्षेत्रनृसिंहवाडीमध्ये राहाण्यास आले, यानंतर त्यांना साक्षात् श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांनी कृष्णाप्रवाहातील श्रीगुरुपीठात (श्रीगुरुचरित्रात याचे वर्णन आहे.) संन्यासदीक्षा दिली. स्वामींच्या समकालीन असणाऱ्या संतकवी गर्दे यांनी संन्यासोत्तर स्वामींच्या प्रत्यक्षध्यानाचे वर्णन श्रीमच्चरित्रात केले आहे.

**वस्त्रे काषाय भस्मी सुतनु विलसति कंठी रुद्राक्षमाळा।**
**शोभे दिव्यासनी तो प्रचुर रुचिर हे देखिले ध्यान डोळा।।**
**अग्री त्या पादुका हो सुजनमनमयी शोभली ज्ञानमुद्रा।**
**स्वामी नारायणाते नमन करु सदा ध्यावू चित्ती यतेंद्रा।।**

कोमल अशा स्वामींच्या दिव्य देहावर काषायवस्त्रे शोभत असून कंठामध्ये विपुल रुद्राक्षमाला आहेत. ज्ञानमुद्रांकित असे ते दिव्य आसनावर असून, गुरुध्यानात तन्मय झाले आहेत. त्यांच्या समोर पादुका आहेत. अशा नारायणस्वामींचे नित्य ध्यान करुन, त्यांना नमस्कार करुया.

Scanned with Cam

याकाळात स्वामींनी संपूर्ण भारतातील तीर्थयात्रा केल्या. यानंतर ते नृसिंहवाडी व कोल्हापूर दोन्ही स्थानी राहात.

दुर्गमानवडचा प्रसंग- श्रीदत्तांनी आज्ञा करावी व त्यानुसार श्रीस्वामींनी आचरण करावे. असा त्यांना संबंध होता. एकदा श्रीदत्तप्रभूंनी स्वामींना दुर्गमानवडास जाण्याची आज्ञा केली. तेथे मार्गात अत्यंत घोर अरण्य तुरळक वस्ती व चोराचिलटाचे भ अशी परिस्थिती होती. यावेळी श्रीनागेशभट गुळवणी यांचे घरी कौलवास श्रीस्वामी आले होते. त्यावेळी त्यांनी (भिल्लातकीच फळे) बिब्बा व सुईदाभण सोबत घेण्याची आज्ञा केली.

संध्याकाळच्या अंधारात स्वामी विठ्ठलाईमातेच्या मंदिरात पोहोचले. सोबत श्रीदेवीचे पुजारी व ब्राह्मणही होते पुजाऱ्यांनी देवीसमोर दिवाबत्ती केली, प्रदोषाची आरती केली व स्वामींनी देवीदर्शनादि केल्यानंतर त्यांना पुनः डोंगराखाली चलण्याची विनंती केली. कारण या डोंगरात जंगली श्वापदे राहात होती. याठिकाणी रात्री नित्य एक वाघ देवीच्या मंदिरात येत असे, त्याच्या घोर डरकाळ्या ऐकावयास येत. त्यामुळे रात्री देवीजवळ कोणीही थांबत नसे. परंतु स्वामींनी 'आपण आज श्रीदेवीच्या मंदिरातच मुक्काम करणार' असल्याचे सांगून, देवीपुजाऱ्यास माघारी पाठविले.

रात्री स्वामींच्या सोबत भाविक व विठ्ठल नावाचे दोन विद्वान स्वामिभक्त ब्राह्मण होते, देवीच्या गर्भगृहात फारच थोडी जागा होती, त्या जागेत स्वामींनी भाविक व विठ्ठल या दोघांब्राह्मणांना बसण्याची आज्ञा केली ते म्हणाले,

**आम्ही यती व्याघ्र शरीर खावू । तुम्ही प्रपंची तनु क्षेम राहू ।।**
**लावा कपाटास सुखी वसाहो । विप्रद्वया स्वामि असे वदे हो ।।३९।।**

''आम्ही निरासक्त संन्यासी आहोत. आमचा देह वाघाने खाल्ला तरी ठिक, परंतु तुम्ही प्रपंची आहात, तुमचा देह क्षेम राहाणे योग्य. तरी आता द्वारास घट्ट लावून सुखाने गर्भगृहात असावे.'' दोघा विप्रांनी प्राणभयाने स्वामींची आज्ञा मान्य केली व श्रीदेवीच्या गर्भगृहाचे द्वार लावून आतील चिंचोळ्या जागते बसून द्वारगवाक्षातून ते बाहेर पाहू लागले. तो देवीच्या मंडपामध्ये लावलेल्या शेकोटीच्या उजेडात स्वामी आत्ममग्न अवस्थेत बसले आहेत, त्यांचे शरीर यत्किंचितही हालत नव्हते. तास दीड तासानंतर ढळढळीत रात्र चढली, गाढ अंधार दाटला. इतक्यात या गूढ वातावरणाला भयानक छेद देणारी वाघाची भयानक डरकाळी कानावर पडली. शिष्यांची घाबरगुंडी उडाली. कारण आपल्या सद्गुरूंना बाहेर ठेऊन, प्राणभयाने ते आत बसले होते. मनातील अपराध भावना व भयभावना जीवघेणी होऊ लागली. ते गवाक्षातून बाहेर पाहू लागले.

बाहेर स्वामी त्या वाघाला वरदहस्त करीत म्हणाले, ''शंभु! शंकरा! ये.'' त्या आज्ञेसरशी वाघ स्वामीसमोर आला व पुढील दोन पाय दंडवतासारखे करु लागला, स्वामींनी त्याचा पाय आपल्या हातात धरुन त्याला जवळ ओढले व त्याच्या डोक्यावर आशीर्वादात्मक थोपटले. यानंतर ओढलेल्या हाताकडे स्वामी पाहातात तो त्या पायात काटा घुसला असून, तो रक्तबंबाळ झाला होता. तो पाय पुढे दाखवित वाघ वेदनापूर्ण करुण डरकाळ्या फोडू लागला. स्वामींनी याचा पाय धरुन हलक्या हाताने सगळ्या पूवाचा निचरा केला, दाभणान काटा काढून त्यावर बिब्बे तापवून त्याचा चटका दिला. जखम वाळली. वाघास स्वस्थता लाभली. यानंतर स्वामी त्याला म्हणाले, ''बाबा ! तू इथुन जा.'' ते ऐकून जमिनीवर शेपूट लोळवत तो वाघ घोर अरण्यात निघून गेला.

हा अद्भुत प्रसंग गवाक्षातून पाहाणारे ब्राह्मण अपराधी भावनेने बाहेर आले व स्वामींच्या पायावर डोके ठेवून रडू लागले व म्हणाले,

**स्वामि अन्यायी आम्ही, शिवतनु तव हे नेणता भ्रांत झालो ।**
**देखो आश्चर्य डोळा, गुरुतर महिमा दर्शना या भुकेलो ।।**
**देहाचा लोभ भारी, धरुनि आम्ही उभौ, अंतरी वास केला ।**



Scanned with Cam

स्वामीते व्याघ्र आम्ही समदिठी अशि हे आजि हा शोध केला ।।
स्वामि नारायणा रे पदीत मन तुझ्या, पूर्ण होई दयाळू ।
नेणो रुपा वरेण्या सदय न तू जरी देह हा येथ जाळू ।।
नानारीत्या स्तवीति, यति वदति तया, स्वस्थ चित्ति असावे ।
इच्छा हे ईश्वराची मनी आणुनी असे, हे न काही वदावे ।।

"स्वामी आम्ही अन्यायी आहो, या क्षुद्र देहाच्या लोभाने आम्ही आत बसलो, तुम्ही अवतारी हे विसरलो, आज आश्चर्य व आपला अगाध महिमा पाहिला, स्वामींना व्याघ्र व विप्र यात समदृष्टी आहे, हे आज आम्ही जाणले. हे स्वामी! आता आमच्यावर दयाळू होऊन, आम्हाला क्षमा केली नाही तर या अग्नितच आम्ही हा देह जाळू." असे अनेकपरीने स्तवू लागले, तेव्हा स्वामी म्हणाले, "अरे! हे ज घडले ती ईश्वराची इच्छा आहे, असे जाणून स्वस्थचित्त असा, आता पश्चातापाचे अधिक काही बोलू नका." यावर सूर्योदयानंतर स्वामी त्या दोन ब्राह्मणांसह तेथून निघाले.

**काठेवाड्यातील चमत्कार** - पुढे स्वामी तीर्थाटन करीत द्वारकेस निघाले, सोबत श्री जनार्दन उपाध्याय, काशीकर व अनेक शिष्य होते. या मार्गात अनेक चोर असून हे यात्रेकरुंस लुटतात, असे ऐकून शिष्यप्रमुख काशीकर म्हणाले, "स्वामी! या मार्गात चोरभय आहे, आपण अन्य मार्गाने जाऊ." तेव्हा स्वामी म्हणाले, "जो चोरांच्या अंतरात आहे, तोच आपल्यात आहे, दुसरी कल्पना का करता?" यानंतर एका ठिकाणी शंभरभर सशस्त्रचोर मार्गात अडवे आले व काशीकरांस विचारु लागले, 'ही यात्रा कोणती?' 'हे गुरु कोण?' त्यांना काशीकरांनी वृत्त सांगितल्यावर त्यांनी श्रीस्वामींना नमस्कार करुन यात्रींना मार्ग करुन दिला. असे मार्गात सर्वत्र घडले.

यानंतर द्वारकानाथाचे दर्शन करुन स्वामी काठेवाड्यास एका ब्राह्मणवस्तीत आले. ते जेथे उतरले होते, त्या ब्राह्मणाच्या लहान बाळाचा अकाळी मृत्यु झाला. वृद्धापकाळी झालेला एकुलता एक मुलगा गेला, म्हणून त्याचे मातापिता - आप्त महाशोक करु लागले. त्याची माता आत्महत्या करु लागली. सर्वच शोकाकूल असल्याने कोणीच कोणास धीर देणारा नव्हता. मातेचा शोक पाहून स्वामींना अतिशय वाईट वाटले, त्यांनी मातेचे अनेक परीने सांत्वन केले. "माते ! या जगात कोणी अमर नाही, हा देह मृत्यूचा घास आहे, ही शाश्वत जीवनमर्यादा आहे," परंतु ती ऐकेना. मग स्वामींनी आपल्या जवळची विभूती काशीकरांस दिली व या बाळाच्या अंगास लावून 'शिव! शिव!' उच्चारीत बाळाच्या मुखात घालण्याची आज्ञा केली त्याप्रमाणे करताच तो बाळ जिवंत झाला. स्वामींच्या सामर्थ्याचा सर्वांना प्रत्यय आला. तेथून ताबडतोब स्वामी नरसोबावाडीस दत्तपदी परत आले.

**श्रीसंत ह. मीरासाहेब व श्री प. नारायणस्वामींची भेट** - हजरत ख्वाजा मुहम्मद चिस्ती हुसेन यांचे चिरंजीव, हजरत ख्वाजा शमशुद्दिन उर्फ शामन्ना मीरा बाबा (गंजबक्ष) हेच मीरासाहेब होय. हे सुफी सांप्रदायिक होते. सुफी म्हणजे सफ्-प्रथमश्रेणी, यापासून सफा हा शब्द निर्माण झाला. सफा म्हणजे स्वच्छता, पवित्रता, आत्म्याची स्वच्छता, पावित्र्य. (सोफिया-परमज्ञानी.)

प्रेषित महंमद पैगंबरांपासूनच या परंपरेचा आरंभ झाला. यामध्ये ख्वाजा मोईनुद्दिन चिश्ति यांचा मध्य आहे. या परंपरेतील मीरासाहेब एक अधिकारी संत होते. या मीरासाहेबांचा समाधीकाल इ. १३८४ आहे आणि स्वामींच्या समाधीस २१० वर्षे झाली. त्यानुसार अगदी या प्रसंगाचा कालावधी २५० वर्षापूर्वी जरी धरला तरी त्यावेळी मीरासाहेबांच्या समाधीला ४०० वर्षे होऊन गेली होती. अर्थात् मीरासाहेबांनी समाधीतून बाहेर येऊन श्रीनारायणस्वामींचे स्वागत केले होते, असे दिसते. हे अद्भुत व गुप्त आश्चर्य आहे.



Scanned with Cam

**राजापुरीची गंगा** - यानंतर स्वामी सिंधुस्नानास निघाले असता, वाटेत कोठेही पाणी मिळेना. दिवस माध्यान्हाच्या वर आला. तेव्हा स्वामींनी शिष्यांना 'पाणी पाहून, तेथेच स्नानसंध्या-भिक्षा करु! मग पुढे जाऊ.' असे सांगितले. त्याप्रमाणे शिष्य गेले परंतु त्यांना कोठेही पाणी आढळेना. इतक्यात त्यांना ओल्या कापडात पाण्याचे पात्र घेऊन जाणारा ब्राह्मण दिसला. स्वामींनी त्याला पाण्याचा ठाव विचारला. यावर तो विप्र म्हणाला, ''गुरुमहाराजांचे आगमन झाले म्हणून येथे अखंडपाणी वाहू लागले आहे,'' असे म्हणून ता गुप्त झाला. हे ऐकून सर्वांना उत्साह वाटला सर्व राजापुरास पोहोचले. येथे प्रत्येक वर्षी माघमासी शिवरात्रीस गंगा प्रगटते व वसंतऋतूत गुप्त होते. स्वामी ग्रीष्मकाळात, कडकडीत उन्हाळ्यात तेथे आले.

गंगा कुंड कोरडे होते, त्यात थोडी ओल देखिल नव्हती. गंगा जावून एक महिना झाला होता. त्या कुंडावर स्वामींनी मस्तक ठेवले. तेव्हा तिथले ब्राम्हण म्हणाले, ''यतिवरा! या स्थानी भागिरथी होती, परंतु ती एक महिन्यापूर्वीच गुप्त झाली.'' ते ऐकून स्वामी ब्राह्मणांना म्हणाले, ''विप्र हो! कुंडातील पालापाचोळा काढून कुंड स्वच्छ धुवून निर्मळ करुन, त्यावर रांगोळी घाला. गंगेची पूजा करा, धूप-दीप-नैवेद्य दाखवा, सुवासिनींच्या सुवस्त्राने ओट्या भरा.'' स्वामींच्या आज्ञेप्रमाणे करुन सर्व विप्र रात्री आपल्या मुक्कामी गेले.

काही शिष्यासह रात्री स्वामी कुंडाजवळ आले, कुंडाला प्रदक्षिणा घालून नमस्कार केला व कुंडापुढे बसून श्रीगंगालहरी म्हणण्यास आरंभ केला. ती दिव्यस्तुती ऐकून जोरजोराने घूघू शब्द करीत गंगा कुंडात प्रगटली, तिचा प्रवाह जोरात उडून आकाशाकडे गेला.

**देही वृत्ति नसे, स्तुती करितसे अंगावरी गांग ये ।**
**होता सावध तोय घेवुनी शिरी स्नाना करी तो स्वये ।।**
**संगी ब्राह्मण येवूनी निरखिती आश्चर्य हे देखिती ।**
**वार्ता ग्रामी निघे त्वरित गतिने तै विप्रते धावती ।।**

गंगेची अनन्य स्तुती करताना स्वामी देहवृत्तीत नव्हतेच, गंगेचा प्रचंड मोठा लोंढा अंगावर आल्यावर स्वामी देहावर आले आणि ते गंगाजल कृतज्ञेने मस्तकावर प्रोक्षून गंगस्नानास कुंडात उतरले, ''गंगा आली आहे, हिला वंदन करा व अन्यत्र स्नान करुन पवित्रतेने इथे गंगास्थान करा.'' त्याप्रमाणे सर्वांनी केले, याठिकाणी स्वामी तीनदिवस राहिले व पुढे गंगेस वंदन करुन सागरस्नानास निघाले. स्वामी निघताच गंगा पुनः गुप्त झाली. पुढे समुद्रस्नान करुन ते नरसोबावाडीस आले.

**वैद्यनाथीचा भगवंतशास्त्री** - नंतर स्वामी फिरत असता वैद्यनाथास आले, तेथे आरोग्यभवानीच्या तळघरात श्रीनरसिंहसरस्वतीस्वामींचे निवासस्थान व पादुका आहेत, तेथे स्वामींचा मुक्काम होता. स्वामींनी सर्वांना श्रीनरसिंहसरस्वती-स्वामींच्या पादुकांचे दर्शन घेण्यास सांगितले. तेथे भगवंतशास्त्री नावाचा ब्राह्मण स्वामींजवळ आला, त्याने स्वामींना व पादुकांना नमस्कार करुन तो मुक्कामास राहिला, तेव्हा मध्यरात्री त्याला मोठा साप चावला.

**देखो सर्पच हा तळिपडे माथाहि झेंडू चढे ।**
**धाव कंपित येत तै लगबगा नारायणाच्याकडे ।।**
**ध्यानी हा यति बैसला,**
**सुभगवन् हाकारि नारायणा ।**
**जाली हो अभिमन्यु पुत्रगती मा धावेच नारायणा ।।**

आपल्याला सापाने चावा घेतला आहे, हे पाहून तो अधिकच गलितगात्र झाला, तसाच धावत स्वामींच्या पुढे गेला, तेव्हा मध्यरात्री स्वामी ध्यानात मग्न होते. त्यांना तो हाका मारू लागला, ''स्वामी धावा.! अभिमन्युसारखी तुमच्या पुत्राची अवस्था

Scanned with Cam

झाली आहे. मला वाचवा.'' ते ऐकून स्वामी भानावर आले त्यांनी आपले सत्शिष्य श्रीकाशीकरांना आज्ञा दिली, ''सर्पदंशित ब्राह्मणाला पादुकांपुढे न्या, स्नान घाला व भस्मलेपन करा. मग पादुकांना रुद्रैकादाशिनी करुन ते तीर्थ ब्राम्हणाला द्या.'' यानुसार करताच तो ब्राह्मण विषमुक्त होऊन निरोगी झाला. यानंतर या भगवंतशास्त्रींनी स्वामींची अनेकविध स्तुती-पुजा केली. तेथून स्वामी श्रीचिदंबर महास्वामींच्या दर्शनासाठी देवलपुरास निघाले.

**श्रीचिदंबर महास्वामींचा सहवास** - श्रीचिदंबरस्वामींचा व श्रीनारायणस्वामींचा पूर्वपरिचय होता. एकदा यात्रेमध्ये चिदंबरस्वामी अमरापुरास (नृसिंहवाडीस) आले असता, नारायणस्वामींनी त्यांना योगाग्नीने स्वयंपाक करुन भिक्षा वाढली होती.

असे श्रीनारायणस्वामी आपल्याकडे येत आहेत, हे पाहून श्रीचिदंबरस्वामी नगराबाहेर स्वामींच्या स्वागतास आले. स्वामींना साष्टांग नमस्कार घालून यांना आपल्या घरी आणून अतिआदराने नारायणस्वामींची महापूजा केली. दिव्यपीठासनावर विविध रांगोळी काढल्या असून अनेक समया व दीपक लावले होते, त्या आसनावर निर्विकारी नारायणस्वामी पद्मासनस्थ होऊन बसले. मग तेथे पात्र ठेऊन यतींचे चरणप्रक्षाळन केले, पुष्प-धूप, दीपादि केले व स्वतः श्रीचिदंबरस्वामींनी मंगळारती केली.

**दत्त जो परमहंस, तो हा नारायणस्वामी ।**
**देखूनी दिव्यडोळा, करी आरती प्रेमी ।।**
**आरती परमहंसा ।।१।।**
**मिळोन आशा सर्व, वृत्ति नाहीशी केली ।**
**उरे, नुरे काही तेथे, येक आनंद बोली ।।**
**आरती परमहंसा ।।२।।**
**सर्वकाळ सर्वठायी, बद्ध मुक्तताही नाही ।**
**चिन्मयरूप तेचि, लागे सखाराम पायी ।।**
**आरती परमहंसा ।।३।।**

यानंतर तेथे स्वामींची यतिभिक्षा झाली. नंतर ते दोघे अवतारी ब्रह्मचर्चा करु लागले. अशाप्रकारे महिन्याहूनही अधिककाळ गेला.

यानंतर भाद्रपदमहिन्यात राहुग्रहण असताना भक्त स्नानास निघाले, परंतु गावातील विहिरीस अत्यल्प पाणी होते. त्या रात्रीही पाऊस झाला. मग चिदंबरस्वामी म्हणाले, ''आपण स्नानास मलापहानदीस जाऊ.'' ते ऐकून स्वामी त्यांना म्हणाले, ''अहो ! आपण अवतारी सत्पुरुष लोकशिक्षणासाठीच हे करता. परंतु इतक्या रात्री आपण लांबवर नदीस्नानास चालला तर भक्तांची गर्दी होईल. रस्त्यात घोर जीवजंतू असतात, त्यांचे भय होईल. तेव्हा आपण वरुणदेव मनी आणून लोकांना येथेच स्नान घाला, ही माझी विनंती मान्य करा.''

तेव्हा चिदंबरस्वामी म्हणाले, ''तुम्ही अग्रअधिकारी आहात, प्रथम तुम्ही स्नान करा.'' तेव्हा एकमेकास आग्रह करीत, दोघे एकमेकाचा हात धरून विहिरीत उतरले. यानंतर यतींना स्नान घालून त्यांनी वर पाठविले. यानंतर जांघेएवढ्या पाण्यात स्नान करुन चिदंबरस्वामी पाण्याबाहेर आले व हात जोडून वरुणाची प्रार्थना करु लागले. यानंतर हातात पाणी घेऊन मार्जन करून ते पाणी स्वतःच्या शिरावर प्राक्षिले. तेव्हा पाणी वाढत वाढत हृदयापर्यंत आले. चिंदबरस्वामींनी त्या जळात पुन स्नान केले व सर्वांना लवकर स्नाने करण्यास आज्ञापिले. यानंतर तेथे सर्वांनी ग्रहणाचे स्नान-दानादि केले. यानंतर काही दिवसांनी चिदंबरस्वामींचा प्रेमळ निरोप घेऊन, श्रीनारायणस्वामी तेथून निघाले.

Scanned with Cam

चिदंबरस्वामी नारायणस्वामींना निरोप देण्यासाठी गावाच्या सीमेपर्यंत आले व नमस्कार करुन म्हणाले, "हे यतिवरा! त्र्यंबकसुत (सखाराम त्र्यंबक गर्दे) नावाचा माझा शिष्य आपल्या कुटुंबासह वेणुग्रामी (बेळगावास) तुरुंगात आहे त्याला जाताना आपण दर्शन द्यावे, आपल्या दर्शनाने माझा सखाराम लवकर मुक्त होईल."

त्यानुसार यतिशिष्टाचार बाजूला ठेऊन, बेळगावी येऊन स्वामी कारागृहात सखारामाकडे आले. किल्ल्याचे दार ओलांडून स्वामी आले व तेथल्या ब्राह्मणांना म्हणाले, "तो त्र्यंबकसुत सखाराम कोठे आहे, त्याला दर्शन देण्यासाठी आम्ही आलो आहोत." तेव्हा अधिकारी म्हणाले, "जी स्वामी ! आपणास प्रार्थना, आमुच्या सोबत चला, आम्ही तुम्हाला मार्ग दाखवितो." अचानक मोठा पाऊस आला. त्यातच स्वामी चालले होते. पुढे हृदयास पाझर फोडणारे स्वामींचे प्रत्यक्षवर्णन सखारामांच्याच शब्दात आपण पाहू.

**द्वारा सन्मुख तो यतेश्वर उभा,**
**जो ब्राह्मणी वेष्टिला ।**
**माथा छत्री दुरोनि विप्र धरिती, पर्जन्य हा लागला ।।**
**दृष्टीस उलटीच खेचरी दिसे, मुद्रा सुज्ञानांगुली ।**
**कंठी अक्षमणी विभूति धवला, सर्वांगी हे शोभली ।।**
**नावाक्षी आणि गौरवर्ण वपु ते आजानुबाहू भला ।**
**ये रे त्र्यंबकआत्मजा म्हणवुनी हा शब्द मी ऐकला ।।**
**गोवत्सासरि धावलोच परि मी, द्वारांतरी तिष्ठूनी ।**
**साष्टांगी नमताचि वूठ म्हणती अश्रु आले लोचनी ।।**
**दोनी ते कर उच्च करुनिया, छात्रापरी दाविती ।**
**चित्ती प्रेम तदा आले, मज बाहू सांगो तसे कीती ।।**

ब्राह्मणशिष्यांनी वेष्टित असा तो, यतीश्वर कारागृहाच्या दारासमोर उभा असून, (पाऊस पडत असल्यान) त्यांच्या माथ्यावर एका विप्राने दुरूनच छत्री धरली होती. अखंड खेचरीमुद्रेत असलेल्या त्यांच्या हाताची सहज ज्ञानमुद्रा झाली होती. त्यांच्या धवळअंगकांतीवर रुद्राक्षमाला शोभत होत्या. (मी या ध्यानात मग्न असतानाच) 'ये रे त्र्यंबकाच्या बाळा!' असा मृदु, मायाळू शब्द माझ्या कानावर पडला. वासरू जसे गाईकडे धावते तसे मी त्यांच्या दिशेने धावलो. दाराच्या आत मी त्यांच्या पायावर साष्टांग घातला, तेव्हा ते मला "ऊठ म्हणाले. दोन्ही हात छत्रासारखे, साऊलीसारखे करुन त्यांनी मला अभय दाखविले. ते पाहून माझ्या मनात अतीव प्रेम दाटून आले, तो भाव मी कसा वर्णन करू.

पुढे स्वामी म्हणाले, "हरिश्चंद्र, धर्मराजा, नलराजा, रघुवीर यांनाही काळाने वनवासादि भोगावे लागले. हे जाणून चिदंबरपदी मन रमव, मला ठाऊक आहे, तुझे भोग आता लवकरच संपत आले आहेत. एक महिन्यात तू इथून मुक्त होशील. मग चिदंबरांना भेटून पुनः ये. तुझ्यासाठी आम्ही पुनः भेटूच. आता भीती सोडून धैर्याने सुखाने राहा." अशी तुला चिदंबरांची आज्ञा आहे. पुनः येतो. असे म्हणत त्यांनी दोनी हात वर करुन आशीर्वाद दिला. यावेळी माझ्या डोळ्यातून अखंड अश्रू वाहातच होते. मी म्हणालो, "स्वामी ! आपल्या पदकृपेनेच हे कष्ट दूर होतील. ज्याला आपला कृपाशीर्वाद लाभेल, तो जीव देहीच परब्रह्म होतो. हे गुरो ! आपला आशीर्वाद असता मला काय न्यून आहे. माझ्यावर नित्य दया ठेवावी." असे बोलून मी यांचे पाय घट्ट धरले, तेव्हा "भिऊ नको ! भिऊ नको ! ऊठ !!"असे म्हणून ते माघारी गेले.

यावेळी सांगली संस्थानिक श्रीमंत चिंतामणराव पांडुरंगराव तथा आप्पासाहेब पटवर्धन होते, यांना श्रीचिदंबरमहास्वामींनी



Scanned with Cam

स्वप्नदृष्टांत दिला व 'अबुनानाला कारागृहातून सोडविण्याची आज्ञा केली.' त्यानुसार सखारामांची कारागृहातून मुक्तता झाली. सुटका होताच ते नारायणस्वामींच्या दर्शनास आले. स्वामींनी सखारामांना अतिप्रेमाने केळी, दूध इत्यादि प्रसाद दिला व विशेष प्रेमाने म्हणाले, ''श्रीचिदंबरांच्या पदरी जा! ते तुला आश्रय देतील.'' असे बोलून ते कृष्णेस गेले.

यानंतर त्यांनी कोल्हापुरास जाऊन, सविधी करवीरयात्रा केली. कोल्हापुरात स्वामींचा मठ होताच. यावेळी करवीरसंस्थानचे राजे श्री छ. शिवाजीमहाराज (तिसरे) तथा बाबासाहेबमहाराज हे स्वामींचे एकनिष्ठभक्त बनले. (यामुळे त्याकाळी स्वामींना राजगुरूंचा मान लाभला.)

श्रीनारायणस्वामींनी सप्तसागरांचे लेखन केले आहे. (सध्या यातील आनंदसागर, ज्ञानसागर, विज्ञानसागर, भजनसागर असे चार सागर मिळाले आहेत. यांचे प्रकाशन झाले आहे.)

**स्वामींची महासमाधी -**

**समाधिस्त कृष्णातिरी होय जेव्हा । धरेपासुनी व्योमपर्यंत तेव्हा ।।**
**दिसे ज्योति एका गमे नाद मोटा । सुदाब्धि नभी वाजती दिव्यघंटा ।।**

जेव्हा स्वामी वसंतऋतु, चैत्र अमावास्या शके १७२७ ला कृष्णातटी समाधिस्थ झाले. तेव्हा भूमीपासून आकाशापर्यंत मोठी ज्योत दिसत होती, आकाशात दिव्यघंटा वाजत असून, त्यांचा नाद अति मधुर होता. यावेळी प्रत्यक्ष पुष्पकविमान आले, त्यांच्या घंटांचा नाद होत होता. हे विमान नदीवर उपासनादि करणाऱ्या प. श्रीगोपाळस्वामींनी पाहिले व ते तातडीने श्रीनारायणस्वामींचे निकट आले. हे विमानारोहण दिव्यदृष्टीने त्यांनी पाहिल्याचे सांगितले जाते.

यानंतर काशीकरांना दृष्टांताज्ञा झाली, यानुसार त्यांनी श्रीनारायणस्वामींची समाधी बांधून पादुका स्थापन करुन, पूजा अर्चा सुरू केली. (आज्ञा कृष्णानंद पादुका स्थापित .) यानंतर पूजारीवर्गास श्रीदत्तगुरूंची आज्ञा घडली, की सायंकाळी श्रीदत्तांच्या प्रदोष आरती नंतर आरती व प्रसाद श्रीनारायणस्वामींस दाखववावा. त्याप्रमाणे पूजारीवर्ग करू लागले.

यानंतर श्रीकाशीकरांस श्रीनारायणस्वामींचा दृष्टांत झाला की, 'कृष्णापंचगंगा संगमी श्रीब्रह्मनंदयती राहातात, त्यांच्या श्रीरामानंदस्वामी नावाच्या शिष्यांकडून तुम्ही संन्यास घ्यावा. यानंतर अखंडसेवा करावी.' त्यानुसार श्रीरामानंदांकडून काशीकरांनी संन्यास घेतला. गुरूंनी त्यांचे नाव कृष्णानंदस्वामी असे ठेवले. यानंतर कृष्णानंदस्वामी नित्य नारायणस्वामींच्या समाधीपूजनात व भजनात रममाण झाले. ज्यावेळी त्यांना गुरूंची आज्ञा होईल तेव्हा ते श्रीचिदंबरांच्या दर्शनास मुरगोडास जात.

**श्रीनारायणस्वामी संप्रदायाचा गोषवारा -**

**स्वामींचा कोल्हापुरातील मठ -** श्रीमहालक्ष्मी मंदिर परिसरात श्रीमहालक्ष्मीच्या डाव्याबाजूस (सरस्वतीदेवीच्या पाठीमागे) स्वामींचा मठ होता. यातील (पाच ओवऱ्यांपैकी) पूर्वेकडील पहिल्या ओवरीतून मठाच्या मागील बाजूस जाण्यासाठी दार होते. तिसऱ्या ओवरीत श्रीदत्तमहाराजांची एकमुखी -षड्भुज मूर्ती होती. तसेच तिसऱ्या व चौथ्या ओवरीच्या दरम्यान भिंतीत ध्यानास बसण्यास मोठा कोनाडा होता. येथे श्रीनारायणस्वामी समाधीस्थान होते. या ओवाऱ्याच्या मागे असलेल्या श्रीस्वामीच्या मठपरिसरास पूर्वी गणेशबाग म्हणत. (या ठिकाणी कोल्हापूरचा श्रीमहर्गलेश्वर क्षेत्रपाळ लिंगस्वरूपात आहे.) ही जागा स्वामींना श्री. बाबासाहेबछत्रपती महाराजांनी मठासाठी दिली होती. दोन जोत्यांवर उभा असलेला मोठा वाडा या ठिकाणी होता, या वाड्याच्या मध्ये स्वामींचे तपःस्थान आहे. (हे स्थान नृसिंहवाडीसारखे छोटे मंदिर व दत्तपादुका स्वरूपात आहेत.) या स्थानाजवळ बेलाचे झाड होते व येथे कुक्कुटेश्वर महादेवलिंग होते, (जे सध्या नारायणस्वामींच्याच ओवरीत आहे.) अशाप्रकारे पाचओवऱ्या त्यावर सोळा खणी भव्य चौसोपी व दुमजलीवाडा, अंगण व तपःस्थान असे

Scanned with Cam

**कुरुंदवाडचे चिवटे**-हे श्रीनारायणस्वामींचे भक्त होते. यांच्याकडे संपत्तीची वानवा होती. यांनी तशी श्रीस्वामींना प्रार्थना केली. तेव्हा स्वामींनी त्यांना सांगितले, ''उद्या सांबाच्या मागे जे असेल ते घेऊन जावा!'' यानुसार त्यांनी सांबाच्या मंदिरामागे पाहिले असता, तेथे जडजवाहीर लादलेला एक उंट होता. ती संपत्ती घेऊन ते धनवान् झाले व श्रीनारायणस्वामींची भक्ती करती राहिले.

**लीलाविश्वंभर**- काशीहून स्वामींनी आणलेले, त्यांच्या नित्य पूजेतील हे लीलाविश्वंभरलिंग स्वामींच्या आज्ञेनुसार श्रीपेटकरस्वामींनी कोल्हापूरच्या मठात स्थापन केले. पुढे सदर लिंग एका तेलंग ब्राह्मणस्वामीभक्ताने आपल्या उपासनेसाठी नेले असता, त्याला झालेल्या दृष्टांतानुसार त्याने ते लिंग श्रीनृसिंहवाडीस दत्तस्थानी दिले.

काहींच्या मते हे लिंग वाडीच्या उत्सवमूर्तीच्या खिडकीखाली असलेल्या लहानसर देवळीत स्थापन केलेल्या देवतांमध्ये आहे. तर दुसऱ्या मते श्रीनृसिंहानंदसरस्वती (दीक्षित) स्वामींना पूजेसाठी हे लिंग वाडीच्या पुजाऱ्यांनी दिले. स्वामींनी वाडी सोडल्यानंतर हे लिंग उमरेड येथील श्रीनारायण मोदी या आपल्या भक्ताला दिले. (संदर्भ- श्रीनृसिंहसरस्वती चरित्र, लेखक-श्रीशंकरस्वामी (पात्कर) नृसिंहवाडी)

**नारायणस्वामींचे वंशज** - श्रीनारायणस्वामींचे वंशज सांगली, मिरज, तासगाव, ब्रह्मनाळ या परिसरात वीसापुरकर जोशी अथवा उपाध्ये या नावाने आहेत. तर हुबळी येथे कट्टी, दीक्षित नावाने नारायणस्वामींची मुख्यवंशशाखा विद्यमान आहे. याच मुख्यशाखेचे वंशज स्वामींच्या समाराधनादि उत्सवासाठी आजही वाडीस येतात.

**नारायणस्वामींची स्थाने** - नृसिंहवाडीमधील स्वामींचे मठस्थान, वीसापुरातील अतिजीर्ण जन्मस्थान, कोल्हापूरामध्ये श्रीमहालक्ष्मी मंदिरातील विद्यमान मठ, भक्तिसेवा विद्यापीठातील प. स्वामींचे तपःस्थान, कात्यायनी डोंगरावरील, मंदिरातील तपःस्थान व कात्यायनी कुंडनजिकचे निवासस्थान, बाबुजमाल नजिक श्री. आनंदकुमार जमदग्नींच्या घरातील श्रीदत्तभिक्षास्थानाच्या मागील देवतांच्या कोनाड्यावर नारायणस्वामींचे नाव लिहितात. श्री. प. दीक्षितस्वामींच्या सदलगे गावातील चव्हाट्यावरील प्राचीन मंदिरामध्ये पादुका आहेत, यावर परंपरेने ।। श्रीनारायणस्वामी प्रसन्न ।। असे लिहितात.

**समारोप**- वर दिल्याप्रमाणे एकेकाळी या स्वामीसंप्रदायाचे व स्थानांचे मोठे ऐश्वर्य होते. परंतु काळाच्या ओघात हे नामशेष झाले. दत्तसंप्रदायातील श्रीवासुदेवानंदसरस्वती (टेंब्ये) स्वामी, श्रीचिदंबर दीक्षितमहास्वामी, मुरगोड, श्री मीरासाहेब (मीरज) योगी श्रीगुळवणीमहाराज या सारख्या सत्पुरुषांना नारायणस्वामी पूज्यस्थानी होते. नरसोबावाडीच्या संप्रदायात श्रीस्वामींचे अग्रस्थान आहे. स्वामींच्या पवित्र आसनाची पुजारी प्रथम पूजा करतात व नंतर मूळदत्तस्थान उघडून काकडारती होते. असा यांना सन्मान आहे.

महाराष्ट्र कर्नाटकात भक्तगण व स्थाने होती, आज हा संप्रदाय स्वात्मभान हारपला आहे. श्रीवाडी दत्तसंप्रदायाचे श्रीगणेश असलेल्या या श्रीमन्नारायणस्वामींच्या चरित्राचे व संप्रदायाचे स्वार्चकस्य स च दृश्यरूपतः ।। अशा चिरंजीवपदप्राप्त श्रीनारायणस्वामींनीच पुनरुद्धरण करुन घ्यावे, ही श्रीदत्ताभिन्न श्रीमन्नारायणस्वामीचरणी प्रार्थना.

Scanned with Cam

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः

## श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीयतिवरचरणविरचितं दिव्यं श्रीमन्नारायणस्वामिचरणानां चरितम् ।

कृष्णापञ्चनदीयोगे ऽभ्यर्च्य श्रीदत्तपादुके ।
भक्त्या नारायणस्वामी जीवन्मुक्तो ऽधुनाभवत् ॥ १ ॥
पुत्र्यावादाय विधुरः कारनाटकदेशतः ।
नृसिंहवाटिकाक्षेत्रमेत्यार्चनपरो ऽभवत् ॥ २ ॥
कर्तुं स्वदासस्य वचो गरिष्ठः शेषस्य सत्यं प्रणिधानतुष्टः ।
ईशः प्रसन्नो ऽभवदल्पबुद्धिप्रार्थ्यस्ततो ऽस्यास समाधिसिद्धिः ॥३॥
अप्रत्तपुत्र्यौ निशि पाययित्वा स्वयं यवागूमथ शाययित्वा ।
समाहितस्ते अथ मेहनाय बुद्ध प्रभुः प्राप तदा ऽवनाय ॥ ४ ॥
नारायणो ऽपि स्वयमेष भूत्वा नारायणो ऽन्यस्तनये गृहीत्वा ।
स्वयंप्रदीपोपि धृतप्रदीपो नीत्वा बहिस्ते जनधीप्रदीपः ॥ ५ ॥
कृतोत्सृती ते विमले विधाय निधाय वेश्माप्यररं पिधाय ।
नारायणो व्युत्थित एति यावन्नारायणो ऽद्वैत इवास तावत् ॥ ६ ॥
ज्ञात्वाथ तद्गर्ह्यमुभे स्वजाते दत्वा द्विजाभ्यां विधिनैव जाते ।
तस्मिन् विरक्ते प्रददौ च तस्मै स प्रैषदण्डाद्यपरो ऽपरस्मै ॥ ७ ॥
यशस्यमीशेन कृतं रहस्यमेतत्त्वविद्वान् मठपः प्रहस्य ।
मनस्यतीवार्तं इवाप्रशस्यं भ्रष्टो ऽयमित्याह स तद्रहस्यम् ॥ ८ ॥
नारायणोक्तिश्रवणात्प्रबोधपारायणं वेद स तं प्रबोधम् ।
नारायणात्प्राप स शिष्यभावपरायणः प्राप परात्मभावम् ॥ ९ ॥


Scanned with Cam

इतीट्प्रसादादपरोक्षसाक्षात्कारो बभूवापि परोऽपि साक्षात् ।
न्यासं स्वतोऽकारयदप्यपूर्वं यस्याधुनाप्यर्चनमस्ति पूर्वम् ॥ १० ॥

शालिवाहनशके भसप्तभूसंमिते स मधुमास्यमातिथौ ।
संस्थितोऽभवददृश्यरूपतः स्वार्चकस्य स च दृश्यरूपतः ॥ ११ ॥

आरब्धे त्वमुना नृसिंहभजने सिंहोऽग्रतः प्राप्तवान्
योन्तःस्थोपि बहिष्ठनत्यवसरे नारायणेत्युक्तवान् ॥
व्याघ्रस्याधिमपाहरद् द्विजवरं यो वैद्यनाथे मृतम्
चक्रे सासुमसौ ददातु भजतां नारायणो नोऽमृतम् ॥ १२ ॥

समाप्तम् । ॐ तत्सत्





Scanned with Cam




Scanned with Cam

# श्रीनारायणस्वामींचें मंदिर



मंदिराच्या डाव्या बाजूस श्रीकृष्णानंदस्वामी ( काशीकरस्वामी )
श्रीनारायणस्वामींचे शिष्य यांची समाधि.

Scanned with Cam

# प. प. श्रीनारायणस्वामी व प. पू. गुळवणीमहाराज यांचे नातेसंबंध

आपणा सर्वांचे प्राणनाथ सद्‌गुरु प. पू. श्रीयोगिराज गुळवणीमहाराज यांचे कुलगुरु म्हणून आपणास परिचित असलेले, दत्तभक्ताग्रणी व दत्तगुरूंचे परम प्रेमांकित श्री प. प. नारायणसरस्वती तथा नारायणस्वामी महाराज हे पू. गुळवणीमहाराजांचे नातेसंबंधित होते असे उपलब्ध साहित्याधारे स्पष्ट होते.

यासाठी प्रामुख्याने समस्त गुळवणी कुलजनांसाठी आधारभूत असा नामवंत इतिहासतज्ज्ञ श्री. मु. गो. गुळवणी (पन्हाळा) यांनी संशोधिलेल्या 'गुळवणीकुलवृत्तांत' या परंपरादर्शक अनमोल ग्रंथाचा व पू. गुळवणी महाराजांच्या समर्थ आशीर्वादबलाने ब्रह्मश्री आत्मारामशास्त्री जेरे यांनी लिहिलेल्या 'श्रीनारायणस्वामी चरित्र' या ग्रंथाचा व इतर संदर्भांचा आधार घेतला आहे. असो.

श्री प. प. नारायणस्वामींच्या द्वितीयपत्नी या तारळे येथील गुळवणी घराण्यातील होत्या. (गुळवणी कुलवृत्तांत, पान ४३) या ठिकाणी कुलवृत्तांतकर्त्याने स्वामींच्या सासऱ्यांचे नाव इ. दिलेले नाही. व्यतिरिक्त श्रीनारायणस्वामी चरित्रात करवीर इलाख्यातील 'तारळे' गावातील राम दीक्षित गुळवणी, नांवाच्या कोणी सद्‌गृहस्थांनी आपली उपवरकन्या यांना दिली. असा उल्लेख आढळतो. (पान ५)


राम दीक्षित गुळवणी या नावाविषयी पाहताना राम हे नाव तर दीक्षित व गुळवणी ही आडनावे आहेत. यामध्येही 'दीक्षित' ही अग्निहोत्री ब्राह्मणाची पदवी आहे. (यांच्या पूर्वजांत कोणी श्रौतादि अग्निउपासक असावेत) यावरून हे नाव राम गुळवणी, दीक्षित असे होते.

कुलवृत्तांतानुसार संपूर्ण महाराष्ट्रभर ( व इतरत्र) पसरलेल्या गुळवणी घराण्याचे (ज्ञात) मूळस्थान तारळे (दुर्गमानवड) हेच आहे. व या घराण्याचा संस्थापक (मूळ पुरुष) हरिपंत हे आहेत. यांच्यापासून पू. गुळवणीमहाराजांचे पणजोबा 'श्रीनागेशभटजी गुळवणी' ही दहावी पिढी आहे. या संदर्भात अधिक सविस्तर माहितीसाठी 'गुळवणी वंशवृक्ष' या कुलवृत्तांतातील वंशावळीनुसार पाहू.



Scanned with Cam

# गुळवणी वंशवृक्ष




या नकाशात आपणांस ज्या पिढीचा अभ्यास करावयाचा आहे, तिचाच येथे उल्लेख केलेला आहे, इतर फांद्यांचा उल्लेख येथे अनावश्यक असल्याने टाळला आहे.

**नागेशभटजी व स्वामींचा पूर्वपरिचय** - उपलब्ध माहितीनुसार प. प. श्रीनारायणस्वामी कोल्हापुरातील मठात साधनरत असताना, श्रीदत्तगुरु व जगदंबा



Scanned with Cam

श्रीमहालक्ष्मीच्या आज्ञेने (वाघाची पीडा दूर करण्यासाठी) श्रीक्षेत्रदुर्गमानवड येथे विठ्ठलाईदेवीच्या दर्शनासाठी जाताना, कौलवगावी श्री. नागेशभट गुळवणी यांचेकडे आले होते. यावरून नागेशभटजी स्वामींच्या समकालीन होते हे निश्चितच. यांचा व स्वामींचा पूर्वपरिचय होता हे चरित्रातील पुढील वाक्यांवरून ध्वनित होते. उदा. तेथे स्वामीमहाराजांनी ज्यांच्यावर अनुग्रह केला होता असे नागेशभटजी / नारायणस्वामींचा 'नारायण' असा गजर ऐकून 'स्वर' ओळखीचा जाणून / बोलावूनसुद्धा न येणारे महाराज अकस्मात आपण होऊन, घरी आलेले पाहून आनंदाने नाचू लागले. (श्रीनारायण स्वामी चरित्र पा. ५४/५५) अर्थातच या पूर्व परिचयाने महाराज कौलवात आले असावेत ( हे ठिकाण दुर्गमानवडहून अदमासे १० मैल अलीकडे आहे.)

शिवाय स्वतःच्या मुलामुलींना देखील दूर ठेवून, आपण निरुपाधिक होऊन, गुरुभक्ती करणारे अथवा आपल्याला भक्तिमार्गात उपाधी बनू पाहणारी छत्रपतींची मागणी ऐकून, अति कर्तव्यकठोरतेने त्यांस आजीवन (प्रत्यक्ष) दर्शन नाकारणारे विरक्तिसाम्राज्याधीश नारायणस्वामी नागेशभटजींच्या कुळास संतती देताना, 'वंशपरंपरेने स्वकीय घराण्यातील कोणीतरी एक मुलगा कोल्हापुरी (मठात) सेवेसाठी द्यावा.' असे प्रेमाधिकाराचे साकडे कोणत्या अधिकाराने घालतील? म्हणून अशा संबंधामध्ये, ऋणानुबंधांची अमूर्त दृढसूत्रे गृहीत धरली तर पुढे असे आढळते -

नागेशभटजींच्या दरम्यान काळात (तारव्यात) अखंड गुळवणी घराण्यात 'राम गुळवणी' हे नाव नागेशभटजींच्या पितामहांचेच फक्त आहे. जे वरील वंशावळीत ८ व्या क्र मांकावर (रामभट) असे आहे. यावरून पाहता निश्चित सनावळी ऐतिहासिक दृष्ट्या उपलब्ध नसली तरी रामभट व त्यांची मुलगी (पू. स्वामींच्या पत्नी) प. प. श्रीनारायणस्वामी व नागेशभटजी गुळवणी यांच्यामधील संबंध निश्चितता व सुसूत्रीपणा स्पष्ट होतो. या रामभटांव्यतिरिक्त नागेशभटांच्या वरच्या अखंड गुळवणी घराण्यात कोणीही रामभट नाही व नागेशभटांचे व स्वामींचे समकालीनत्व पाहता, तसेच स्वामीजींचे या घराण्याशी असलेले संबंध पाहता एकूण असे दिसते की, नागेशभटजींच्या आत्यांचे पती (अर्थातच प. पू. गुळवणी महाराजांच्या पणजोबांच्या आत्यांचे पती) श्री प. प. नारायणस्वामी हे होत. या संबंधाने व गुळवणी घराण्याचे पावित्र्य, धर्माचरण, भक्ती, ईशसेवा अशा सद्गुणांचा परमोच्च परिपाक म्हणून त्यांस प. प. श्रीनारायणस्वामींचा संबंध, आशीर्वाद व अव्याहत कृपाप्रसाद निरंतर लाभला.

**सुहास मधुकर जोशी**, २९१४ 'ए' वॉर्ड, वांगीबोळ
महाद्वार रोड - कोल्हापूर - ४१६०१२, फोन - ६२४७९२

॥अथज्ञानसागरप्रारंभः श्रीदत्तात्रयप्रसन्न त्रे

Gurutatva Prakashan

त्तदेव पावताझालास्वमेव दत्तात्रेयाआलीकीव नारायणाची ३६ दत्तदेवेना
रायणा दिव्यज्ञानदिधलेजाणा अंतरीच्यागुह्यखुणा दयाळुत्वेसांगितल्या
३७ तेणेदिधलीमातेंआज्ञा ग्रंथरचनेचीप्रज्ञा भावेंवंदोनियांसर्वज्ञा ग्रंथ
लिहिलाआदरें ३८ याचेभावेंअवलोकन करीलजोकांभाविकजन होईल
त्याचेसमाधान सद्गुरूच्याप्रसादे ३९ निरंजनाचेबोले नारायणतोसहजडो
ले दत्ताचीतींपाउले सदासेवीस्वरूपी १४० इतिश्रीमत्परमतपःपरा
यणश्रीमन्नारायणविरचितेज्ञानसागरेज्ञानतत्त्वनिरूपणंनामपंचमस्तरं
गः श्रीमत्सद्गुरुदत्तात्रयार्पणमस्तु समाप्तोयंग्रंथः श्री

शके१७८६

Scanned with Cam